व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात सन २०११-१२, २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षात खरेदीमध्ये झालेली अनियमितता व आर्थिक भ्रष्टाचार तसेच सन २०१३-१४ मध्ये दरकरार पत्रावर खरेदी प्रकरणी झालेली अनियमितता, याची सखोल चौकशी करण्यासाठी चौकशी समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन निर्णय क्रमांक : व्यशिअ-२०१५/(३८७-भाग २)/व्यशि-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार भवन, मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक: ०५ ऑगस्ट, २०१९

संदर्भ:-१) संचालक, (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १/व्हीओसी/२०१४/०४०, दि.१८.१०.२०१४.
२) संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र.१६/ व्यशिप्रशि/ २०१५/२६५, दि.१०.१२.२०१५.
३) संचालक (प्रशिक्षण) (सेवा व लेखा विषयक बाबी), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,म.रा., मुंबई यांचे पत्र क्र.१/तक्रार/२०१५/४१, दि.२२.१२.२०१५.
४) शासन निर्णय समक्रमांकित दि.२९.११.२०१७.

प्रस्तावना:

उपरोक्त संदर्भाधीन क्र.१, २ व ३ येथील पत्रान्वये, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात सन २०११-१२, २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षात खरेदीमध्ये प्रशासकीय व वित्तीय अनियमितता होऊन आर्थिक भ्रष्टाचार झाल्याबाबत तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामध्ये सन २०१३-१४ मध्ये दरकरार पत्रावर करण्यात आलेल्या SSSC Lathe All Geared Stock-१५०० या खरेदीमध्ये प्रशासकीय व वित्तीय अनियमितता, फसवणूक व निधीचा गैरव्यवहार झाल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी/अहवाला अनुषंगाने सखोल चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्यासाठी संदर्भ क्र.४ येथील शासन आदेशान्वये मा.अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा, व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येवून, सदर समितीस दोन महिन्यात अहवाल सादर करण्याबाबत दि.२९.११.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये आदेशित करण्यात आले होते. समितीस अहवाल सादर करण्याकरिता वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली होती. या कालावधीत समितीच्या बैठकाही झाल्यात. तथापि चौकशी अहवाल अद्यापही अंतिमत: सादर झालेला नाही.यास्तव, सदर समिती रद्द करुन त्याऐवजी नवीन चौकशी समिती गठीत करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामध्ये सन २०११-१२, २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षात खरेदीमध्ये प्रशासकीय व वित्तीय अनियमितता होऊन आर्थिक भ्रष्टाचार झाल्याबाबत तसेच सन २०१३-१४ मध्ये दरकरार पत्रावर खरेदी करण्यात आलेल्या SSSC Lathe

All Geared Stock-१५०० खरेदी प्रकरणी झालेली प्रशासकीय व वित्तीय अनियमितता, फसवणूक व निधीचा गैरव्यवहार या प्रकरणी शासनास प्राप्त झालेल्या तक्रारी व अहवाल याअनुषंगाने सखोल चौकशी करण्यासाठी दि.२९.११.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेली समिती रद्द/बरखास्त करण्यात येत आहे.

२. आता, उपरोक्तपणे रद्द/बरखास्त करण्यात आलेल्या समिती ऐवजी खालीलप्रमाणे चौकशी समिती गठीत करण्यात येत आहे:-

१.	अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.	अध्यक्ष
२.	अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.	सदस्य
३.	अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.	सदस्य
४.	अपर मुख्य सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.	सदस्य सचिव

३. उपरोक्त समिती, उपरोल्लेखित बाबींसह, याबाबींसंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारी व अहवालावर सुद्धा चौकशी करतील.

४. सदर चौकशी समितीची कार्यकक्षा ही संदर्भाधीन क्र.४ येथील दि.२९.११.२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या कार्यकक्षेप्रमाणे राहील.

५. सदर चौकशी समितीस सर्व आवश्यक ती कागदपत्रे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथील संबंधित अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावीत. तसेच त्यांनी समितीस त्यांच्या कामकाजात आवश्यक सहकार्य वेळोवेळी करतील.

६. उपरोक्त समितीने त्यांचा अहवाल शासनास लवकरात लवकर सादर करणे अपेक्षित आहे.

७. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग हे निश्चित करतील त्या ठिकाणी समितीचे कामकाज/बैठका आयोजित करण्यात येतील व समितीच्या कामकाजासाठी आवश्यक ती माहिती व दस्तऐवज उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०८०५१३२७४३०७०३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Santosh Vithal Rokade

Digitally signed by Santosh Vithal Rokade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ca5751ffedbb005fdff34ab6ac1f8319d061483d7d35e20f744e251360f7920a, serialNumber=ecf4a9abe84c70de989c3669424c12b6cadcb583d500fe489ce8727916e0bbee, cn=Santosh Vithal Rokade
Date: 2019.08.05 17:13:20 +05'30'

(संतोष वि. रोकडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) उपसंचालक, (मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना), उद्योग संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.
८) उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय (खरेदी प्रक्रिया विषयाशी संबंधित), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत-

१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
३) मा.सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा.मंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता) यांचे खाजगी सचिव.
५) मा.राज्यमंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता) यांचे खाजगी सचिव.
६) उप सचिव (व्यशि), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई.
८) निवड नस्ती (व्यशि-१).